# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४(१९९४ चा महा. ३५) च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक (६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

**( परीक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग )**

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली–४४२६०५

फोन नंबर ०७१३२–२२३३२० website : www.unigug.org

E-mail :coegondwana@gmail.com


जा.क्र.गों.वि./परीक्षा विभाग/ ११ /२०२३ दि. ०३/०१/२०२४

प्रति,

१) मा. प्राचार्य, आनंद निकेतन महाविद्यालय, वरोरा, जि. चंद्रपूर.

२) मा. प्राचार्य, विवेकानंद महाविद्यालय, भद्रावती, जि. चंद्रपूर.

३) मा. प्राचार्य, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, जि. चंद्रपूर.

४) मा. प्राचार्य, शांताराम पोटदुखे विधी महाविद्यालय, तुकुम, चंद्रपूर.

५) मा. प्राचार्य, निळकंठराव शिंदे कला व विज्ञान महाविद्यालय, भद्रावती, जि. चंद्रपूर.

**विषय: दूष्काळसदृश्य परिस्थिती घोषित करुन सवलती लागु करण्यास पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.**

**संदर्भ: १) शासन निर्णय क्र. एससीवाय–२०२३/प्र.क्र.३७/म–७, दि. ३१/११/२०२३.**
**२) शासन निर्णय क्र. एससीवाय–२०२३/प्र.क्र.३७/म–७, दि. १०/११/२०२३.**

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये कळविण्यात येते की, दि. १८/१०/१९९३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची विद्यापीठ व परीक्षा मंडळे यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याची योजना लागु केली आहे. यामध्ये अकृषी विद्यापीठांकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्काचा समावेश आहे.

उपरोक्त संदर्भानुसार २०२३–२४ मधील दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित करुन सवलती लागु करण्यात आलेल्या तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक सत्र २०२३–२०२४ मधील परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत पात्र विद्यार्थ्यांचे चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती तालुक्यातील चंदनखेडा व मुधोळी येथील रहिवासी विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफीसंबंधी संदर्भाधीन दि. १०/११/२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधीत विद्यार्थ्यांचे कागदपत्रांसह मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांचे कार्यालयास तात्काळ प्रस्ताव सादर करण्यात यावे व त्याची एक प्रत संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, गोंडवाना विद्यापीठ यांना सादर करावी. सदर माहिती शासनास सादर न केल्यास व विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान झाल्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील, याची नोंद घेण्यात यावी.

**सहपत्र: वरीलप्रमाणे.**

**संचालक (प्र.)**
**परीक्षा व मुल्यमापन मंडळ**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

प्रतिलीपी: मा. कुलगुरु महोदय, यांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

CamScanner